रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अपर
जिल्हाधिकारी कार्यालय,दापोली
कार्यान्वित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्राफेब-२०२६/प्र.क्र.८०(अ-२)/पुनर्रचना**
पहिला मजला, मंत्रालय मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई -४०००३२
दिनांक : २२ सप्टेंबर, २०२६

**वाचा:-** शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. पदनि २०१९/प्र.क्र.६८ (भाग-२)/आस्था-८, दि.०२.०४.२०२६

**प्रस्तावना:-**

रत्नागिरी जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार, वाढती लोकसंख्या व नागरीकरण तसेच जिल्हा मुख्यालयापासून दापोली, खेड व मंडणगड या तालुक्यांचे अंतर विचारात घेता, सद्यस्थितीत जिल्हास्तरीय महसूल विभागाशी निगडीत कामकाजांसाठी नागरिकांना जिल्हा मुख्यालयी जाणे भाग पडते. नागरिकांची सोय, प्रशासन अधिक लोकाभिमुख करणे तसेच शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने **रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अपर जिल्हाधिकारी कार्यालय,दापोली** स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अपर जिल्हाधिकारी कार्यालय,दापोली स्थापन करण्यास शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. पदनि २०१९/प्र.क्र.६८ (भाग-२)/आस्था-८, दि.०२.०४.२०२६ मधील परिशिष्ट-३ अन्वये मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-१० मध्ये नमूद केल्यानुसार पदांना मंजुरी देण्यात आली आहे. सदर पदे संबंधित संवर्गाचाच भाग राहतील.

२. त्याअनुषंगाने, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अपर जिल्हाधिकारी कार्यालय,दापोली कार्यान्वित करण्यास व आवश्यक आनुषंगिक बाबींना या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३. रत्नागिरी जिल्ह्यातील अपर जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी तसेच अपर जिल्हाधिकारी कार्यालय, दापोली यांच्या कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे तालुके राहतील:-

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | तालुके | एकुण तालुके |
|---|---|---|---|
| १ | अपर जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी | रत्नागिरी, गुहागर, चिपळूण, संगमेश्वर (देवरुख), लांजा, राजापूर. | ६ |
| २ | अपर जिल्हाधिकारी कार्यालय, दापोली | दापोली, खेड, मंडणगड. | ३ |

४. अपर जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी व अपर जिल्हाधिकारी कार्यालय, दापोली या दोघांचेही प्रतिवेदन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, रत्नागिरी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई हे काम पाहतील.

५. अपर जिल्हाधिकारी, दापोली यांना या शासन निर्णयान्वये कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. जिल्ह्यामध्ये नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय कार्यान्वीत झाल्यानंतर,विषय वाटपानुसार जिल्हाधिकारी कार्यालयातील अपर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी जो विषय हाताळत असतील, तेच विषय त्यांच्याशी संबंधित कार्यक्षेत्राबाबत नविन अपर जिल्हाधिकारी कार्यालयातून हाताळण्यात येतील. कोणत्याही परिस्थितीत जिल्हाधिकारी यांचेकडे असलेले अधिकार अपर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वापरण्यात येणार नाहीत.

७. सदर कार्यालयासाठी अपर जिल्हाधिकारी, तहसिलदार यांची पदस्थापना शासनस्तरावरून करण्यात येईल. इतर अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांची पदस्थापना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी उपलब्ध अधिकारी/कर्मचाऱ्यांमधून त्यांचे स्तरावर करावे.

८. सध्या तात्पुरत्या स्वरूपात नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यासाठी तात्पुरते कार्यालय निश्चित करावे. तदनंतर कायमस्वरूपी जागा शोधून नवीन कार्यालयाच्या बांधकामाचा प्रस्ताव शासनास त्वरित सादर करावा.

९. परिच्छेद क्र.७ व ८ मध्ये नमूद बाबींची पूर्तता करून त्याबाबतचा १५ दिवसांत शासनास अहवाल सादर करावा. तदनंतर कार्यालयाचे प्रत्यक्ष कामकाज सुरू करण्याबाबत शासनस्तरावरून कळविण्यात येईल.

१०. जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी या कार्यालयाकरीता येणारा खर्च ज्या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात येतो, त्याच लेखाशीर्षाखाली अपर जिल्हाधिकारी कार्यालय, दापोली या कार्यालयाकरीता येणारा खर्च दर्शविण्यात यावा. सदरचा खर्च सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा. सदरहू लेखाशीर्षाखाली मंजूर तरतूद अपुरी पडत असल्यास, आठमाही अंदाजपत्रक सादर करताना वाढीव तरतुदीची मागणी करावी; ते शक्य नसल्यास पूरक मागणीचा प्रस्ताव शासनास सत्वर सादर करण्यात यावा.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९२२२००१५३२५४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by RANI DEELIPRAO DEOKATE
Date: 2026.09.22 20:02:56 +05'30'

**(राणी दि. देवकते)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (रा.उ.शु, क्रिडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (रवका), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
१५. जिल्हाधिकारी, रत्नागिरी.

१६. अपर जिल्हाधिकारी, दापोली, जि. रत्नागिरी.
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१८. जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी.
१९. संबंधित उपविभागीय अधिकारी, जि. रत्नागिरी.
२०. संबंधित तहसिलदार, जि. रत्नागिरी.
२१. वित्त विभाग (का. विसू-१/ अर्थसंकल्प-६/ व्यय-९/ आ.पु.क.), मंत्रालय, मुंबई.
२२. महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने.
२३. निवड नस्ती-कार्यासन पुनर्रचना.